Please consider the environment before printing...

दिनांक:- 15 / 09 / 2024

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

# Engineer's Day 2024



15 SEP 1861 – 12/14 APR 1962

## प्रस्तावना:

भारतामध्ये दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन (इंजिनियर्स डे) म्हणून साजरा केला जातो. भारतातील महान अभियंत्यांपैकी एक, मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त भारतात दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय अभियांत्रिकी दिवस साजरा केला जातो.



आधुनिक भारताचे विश्वकर्मा म्हणून आजही मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचे मोठ्या आदराने स्मरण केले जाते. त्यांच्या काळातील महान अभियंता, शास्त्रज्ञ आणि निर्माते म्हणून स्वतःचे जीवन देशसेवेसाठी समर्पित करणारे डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची गणना केवळ भारतातच नव्हे तर जगातील महान प्रतिभावंतांमध्ये केली जाते.

## अभियांत्रिकी दिवस 2024 मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या:

देशभरात १५ सप्टेंबर या दिवशी अभियांत्रिकी दिवस साजरा केला जातो. भारतातील पहिले अभियंते मोक्षगुंडम विश्वेश्वरय्यायांचा हा जन्मदिवस. कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहळ्ळी या खेडेगावात १८६१ साली त्यांचा जन्म झाला. अत्यंत अवघड असलेली इंजिनियरिंग परीक्षा त्यांनी पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण करून देशातील पहिले अभियंता (इंजिनियर) बनण्याचा मान मिळवला.

वयाच्या पंधराव्या वर्षी मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या वडिलांचे निधन झाले. घरातली परिस्थिती अनुकूल. शिक्षणासाठी पैसे नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत विश्वेश्वरय्या यांनी स्वतःच्या विद्वत्तेवर शिष्यवृत्ती मिळवून बंगळुरू येथे सुरुवातीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या वयाच्या अवघ्या तेवीसाव्या वर्षी त्यांच्या बुद्धिमत्तेतील स्थापत्य विषयातील नैपुण्य लक्षात घेऊन त्यांना तत्कालिन मुंबई इलाख्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता म्हणून नियुक्ती देण्यात आली. त्याचबरोबर १९०४ साली त्यांना बढती मिळून संपूर्ण देशाचे पहिले अभियंता होण्याचा बहुमान देण्यात आला. त्या काळामध्ये अभियंता या पदावर इंग्रज लोकच अभियंता म्हणून काम करत होते. विश्वेश्वरय्या यांना हा बहुमान मिळाल्याने त्यांचे संपूर्ण देशातून कौतुक झाले.

आपल्या नोकरीच्या कार्यकाळात मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी ठिकठिकाणी २४ वर्षे नोकरी केली. त्यानंतर आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन म्हैसूर संस्थानचे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी काम पाहिले. त्या काळात विश्वेश्वरय्या यांनी कृष्णराज सागर या कावेरी नदीवरील धरणाचे काम पूर्ण केले. या कामाचे पारितोषिक म्हणून गौरवार्थ म्हैसूर संस्थानचे दिवाणपद त्यांना बहाल करण्यात आले.

## आधुनिक म्हैसूरचे जनक:

मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी म्हैसूर साबण कारखाना, बंगळुरू कृषी विद्यापीठ, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इतर अनेक उद्योगांची स्थापना केली. महाराष्ट्रातील खडकवासला धरणातील स्वयंचलित दरवाजे ही त्यांचीच देणगी आहे. त्यांनी म्हैसूर साबण कारखाना, बंगळुरू कृषी विद्यापीठ, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इतर अनेक उद्योगांची स्थापना केली.

## विश्वेश्वरय्या यांची देशाच्या वैभवात भर घालणारी महत्वाची कामगिरी:

मुळात प्रतिकूल परिस्थितीतून वर आलेल्या विश्वेश्वरय्या यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या समाजातील घटकांसाठी काहीतरी करून दाखवण्याची जिद्द होती. त्यावेळची शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय दुर्दैवी होती. शेतकरी शिक्षीत नव्हते. त्यांना शेतीचे ज्ञान व्हावे म्हणून विश्वेश्वरय्या यांनी म्हैसूर विद्यापीठाची स्थापना केली. तसेच भद्रावती येथील लोखंड आणि पोलाद कारखाना हे त्यांच्या महत्त्वपूर्ण कामगिरीचे जिवंत प्रतिक आहेत. खरं तर आज देशात दिसून येणाऱ्या औद्योगिकीकरणाच्या प्रगतीची मुहूर्तमेढ विश्वेश्वरय्या यांनी रोवली. त्यांनी देशाच्या अनेक कामे केली.

सेवानिवृतीनंतर देशभरातील वेगवेगळया संस्थांमध्ये विविध पदांवर राहून विश्वेश्वरय्या यांनी चाळीस वर्षे अखंड काम केले. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा होती. त्या वयातही ते ज्या ऊर्जेने काम करीत होते. विश्वेश्वरय्या यांनी त्या काळी एडन शहराच्या पाणीपुरवठा व जलनिःसारणाच्या योजना राबवून इंग्रज अभियंत्यांना आश्चर्यचकित केले होते. तसेच सिंचन क्षेत्रातील ब्लॉक सिस्टीमचा पाया सुद्धा विश्वेश्वरय्या यांनी घालून दिला आहे.

## देशातील अभियंत्यांचे प्रेरणास्रोत:

विश्वेश्वरय्या यांची राहणी अगदी साधी होती. म्हैसुरी पद्धतीचा फेटा व साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित होते. ते जितके साध्या स्वभावाचे होते तितकेच ते काही बाबतीत परखडही होते. विश्वेश्वरय्या यांना अंधश्रद्धा मान्य नव्हती. मानवात देव आहे व मानवाची सेवा हिच ईश्वरसेवा आहे, असे त्यांचे प्रामाणिक मत होते. ते जसे बोलत होते त्याच पद्धतीने ते वागतही होते.

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

## भारतरत्न पुरस्काराचे मानकरी:

विश्वेश्वरयांच्या सर्वात प्रसिद्ध प्रकल्पांमध्ये म्हैसूरमधील कृष्णा राजा सागरा धरणाचा विकास, दख्खनच्या पठारावरील सिंचन प्रणालीची अंमलबजावणी, हैदराबादसाठी पूर संरक्षण फ्रेमवर्क इत्यादींचा समावेश आहे. १९५५ मध्ये त्यांना भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणजेच 'भारतरत्न पुरस्कारा'ने गौरवण्यात आले. विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिभेची आणि कर्तृत्वाची ओळख म्हणून, किंग जॉर्ज पंचमने त्याला ब्रिटिश इंडियन एम्पायरचा नाइट कमांडर म्हणून संबोधले.

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401